महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. ६९८५२२००
सी. आय. एन.:U40109MH2005SGC153645

जा.क्र. औसंवि/अ/कंत्राटी/नेमणूक/३४४१५ दिनांक : २७/१०/२०२५

# परिपत्रक

विषय : क्षेत्रिय परिमंडळांतर्गत रिक्त असलेल्या तंत्रज्ञ पदांवर ९५ % पर्यंत बाहयस्त्रोत संस्थेद्वारे कंत्राटी कामगारांची नेमणूक करणेबाबत.

संदर्भ : संचालक (वित्त) यांचे परिपत्रक क्र. Director (Finance)/MSEDCL/००४१ दि. २९/०९/२०२०.

***********

कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६ दि. ०२/०५/२०१६ अन्वये, महावितरणतर्फे मंजूर केलेली व रिक्त असलेली वर्ग ३ व ४ ची विभाग / मंडलस्तरीय सेवाजेष्ठतेची पदे प्रदिर्घ काळ रिक्त असल्यास अशा पदसंख्येचा विचार करुन विहीत पध्दतीने नियुक्त झालेले कर्मचारी व अतिरिक्त ठरलेले कर्मचारी वजा जाता उर्वरीत रिक्त पदसंख्येच्या ९५ % संख्येपर्यंतच्या कंत्राटी कामगारांची सेवा कामाची निकड, गरज विचारात घेऊन किमान कालावधीसाठी उपलब्ध करण्याबाबत सुचना पारित करण्यात आल्या होत्या. परंतू, कोविड-१९ मुळे लागलेल्या टाळेबंदी (Lock down) च्या पार्श्वभुमीवर कंपनीच्या आर्थिक स्थितीचा विचार करता काटकसरीचा उपाय म्हणून बाहयस्त्रोत तांत्रिक कर्मचाऱ्यांची (Line Staff) संख्या ८५% पर्यंत कमी करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते.

२. तथापि, महावितरण कंपनी अंतर्गत काही परिमंडळांचे कार्यक्षेत्र भौगोलिक दृष्टया मोठे आहे. तसेच, मंडलांतर्गत उपविभागातील ग्राहक संख्या देखील कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने सर्व ग्राहकांना उत्तम प्रकारे सेवा देणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा देणे, वीज पुरवठा खंडीत झाल्यास तत्काळ दुरुस्ती करणे त्याच बरोबर अत्यंत महत्त्वाचे वीज देयक वसुली इत्यादी बाबी असल्याने, ग्राहकांना उत्तम सेवा देण्याकरीता तसेच महसूलाचा विचार करता, कामाची निकड, गरज विचारात घेऊन तंत्रज्ञ पदांच्या (Line Staff) रिक्त पदसंख्येच्या ९५ % पर्यंत कंत्राटी कामगारांची बाहयस्त्रोत संस्थेमार्फत नेमणूक करण्याबाबतची बाब कंपनी प्रशासनाच्या विचाराधीन होती.

३. आता, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संचालक (वित्त) व संचालक (मानव संसाधन) यांचेशी विचारविनिमय करून क्षेत्रिय परिमंडळांतर्गत रिक्त असलेल्या तंत्रज्ञ पदांवर ८५ % ऐवजी ९५ % पर्यंत बाहयस्त्रोत संस्थेद्वारे कंत्राटी कामगारांची नेमणूक करण्याबाबत मंजूरी प्रदान केली आहे.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal या संकेतस्थळावर Industrial Relations Department येथे प्रसिद्ध करण्यात आले असून, सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत कोणत्याही कार्यालयास देण्यात येणार नाही.

(परेश भागवत)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत :-**

१. प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.
२. उप महाव्यवस्थापक (मा.व तं.- संपर्क पोर्टल), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
**- संपर्क पोर्टलमध्ये उपरोक्तपणे योग्य कार्यवाही करावी.**

D:\SSPisey 3\OUTSOURCING/letter.docx